# रातवा

चंद्रकुमार नलगे

रिया पब्लिकेशन्स्

**रातवा : चंद्रकुमार नलगे**

© **चंद्रकुमार नलगे**

चंद्रबन, साहित्य निवास कॉलनी,
उजळाईवाडी, कोल्हापूर.
फोन : २६७७०३४

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत
९६८९९०९८९८

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मे, २०१२

**किंमत**
रुपये ४००/-

**ज्या**
**रानवाऱ्यात**
**रूपवेल्हाळ निसर्गात**
**कृषिसंस्कृतीच्या**
**जीवन रहाटीत**
**माझं 'पाऊल'**
**वाटावळणांनी बळ घेत राहिलं**
**त्या सर्व**
**समरूपांना**
**मन:पूर्वक**
**अर्पण**

रातवा...
काळ्याकुट्ट
निबीड
अशा
भरमाध्यान्हीच्या
भररात्रीची
मनावर दडपण आणणारी
आकाशपोकळीपर्यंतची भरून राहिलेली
एकांत
घुंऽऽईंऽऽ अशा किनाट आवाजानं
विलक्षण गूढगंभीर
बनलेली
घन काळोखी
काळस्थिती !

ज्या मातीमाऊलीने तुमच्यासारख्या
प्रतिभावंताची निर्मिती केली ती माती
माझ्या हातापायांच्या डोळ्यांनी
स्पर्शिण्यास मला आनंद वाटेल

– आनंद यादव

किती झेलावे हिंगोळ
पेटलेले रानोरानी !

# मनोगत

मराठीत अनेक आत्मचरित्रं आली. आत्मकथनं प्रसिद्ध झाली. यादृष्टीनं मराठी साहित्य समृद्ध आहे. मला ज्यांनी जवळून पाहिलं आहे, त्यांनी मी माझे आत्मचरित्र लिहावं असं सारखं टुमणं लावलं; पण मी ते मनावर घेतलं नव्हतं. कुणी म्हणालं, लेखकाची साहित्यनिर्मिती हे त्याचे आत्मचरित्रच असते. मलाही ते काही प्रमाणात जाणवलं; पण तरीही निश्चितपणे वाटलं की, लेखक हा आत्मानुभव लिहित असला तरी त्याहीपेक्षा त्याचं जगणं आणि घडणं हे काहीसं वेगळं असू शकतं. असतंच.

माझ्यावर प्रेम करणाऱ्या अनेक चाहत्यांनी, मित्रांनी सतत 'मी आत्मकथन लिहावंच' असा वारंवार लकडा लावल्यानं आणि मलाही त्याचं अगत्य वाटू लागल्यानं मी माझं आत्मकथन लिहिण्यास प्रवृत्त झालो. यापूर्वी मी व डॉ. गंगाधर पानतावणे यांनी मिळून 'दलित आत्मकथन', 'स्त्री आत्मकथन' ही पुस्तके संपादित केली होती. त्या वाचनाचाही नकळत प्रभाव माझ्यावर होता.

माणसाचं जगणं हे एकट्याचं नसतं. अनेक वाटांनी अकल्पिताचा भोगवटा वाट्याला येतो. साऱ्या 'भोवतालच्या' वाईटसाईट, चांगल्याचुंगल्या, लहानमोठ्या घडामोडींनी माणसाचं व्यक्तिमत्त्व घडत-बिघडत असतं. उंबरठ्याच्या आतील जगातून आणि उंबरठ्याच्या बाहेरच्या उघड्या जगातून नाना पदरी आणि नाना परीचे संस्कार माणसाला इलाजानं, नाइलाजानं झेलावे लागतात.

कधी मोहरणं वाटेवर उभं असतं, कधी कुस्करणं नि झुरणं वळणा-आडवळणानं वाट अडवून जातं. माझं ग्रामीण जीवनातील जगणं, हरणं-फुलणं, पडणं-झडणं, त्यातून वेटोळून आलेला उभा संघर्ष माझ्या जडणघडणीत वाटेकरी झाला आहे. ऊन, वारा, पाऊस, नद्या, डोंगरदऱ्या, डोईवरचं खुलं आभाळ यांच्याद्वारे निसर्गाचं अपरूप लाभलं. भोवतालातील अवघं प्राणिमात्र, पशुपक्षी, कीडामुंगी, मायमाती, पीकताट यांचं मैत्र अनिवार्य होतं. ग्रामीण जीवन रहाटीतील लोकजीवन, लोकपरंपरा, लोकसंस्कृती, कृषी संस्कृतीशी निगडित असलेली बारा बलुतेदारी, भिकारबलुतं, अनाकलनीय

नियती, असेल तर दैव, सामाजिक व्यवहार यांच्यातून जगणं, झगडणं असेल ते म्हणजे माझं जीवन. भोवतालच्या कोंडलेल्या अंधारानंच बळ दिलं. मी चालूबोलू लागलो. अक्षरं जिवलग बनली. सामाजिक दाह मनाची उलघाल करू लागला. यातूनच 'रातवा' आकाराला आले.

माझ्या अवतीभवती सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय असा तत्कालीन हवा, नको असा काळ पट होता. त्याचं चित्रही अपरिहार्यतेनं 'रातवा'त आलं आहे.

हे आत्मकथन पूर्णरूपाला जावं यासाठी अनेकांच्या प्रेमळ भावना कारणीभूत ठरल्या आहेत. त्या ज्ञात-अज्ञात चाहत्यांच्या ऋणात राहणेच मी गौरवाचे समजतो.

'रातवा' लिहिताना मित्रवर्य फ.मुं. शिंदे यांच्याशी अनेकदा चर्चा केली. त्यांनी वेळोवेळी मौलिक सूचना केल्या. बळ दिलं. त्यांचे आभार मानावे तरी कसे ?

'अजब पब्लिकेशन्स्'चे श्री. शितल मेहता यांनी 'रातवा' प्रकाशित करण्यासंबंधी अत्यंत आत्मीयतेने लक्ष घातले व त्याला सुंदर मूर्तरूप दिले याबद्दल मी त्यांचा कायमचा ऋणाईत आहे.

मुखपृष्ठकार श्री. कुमठेकर व ज्यांचे ज्यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष 'रातवा'च्या घडणीसाठी हातभार लागले त्यांचे मन:पूर्वक आभार !

**– चंद्रकुमार नलगे**

# १

गुडूप अंधाराचं घर कसं असतं ते पाहायचं झालं, तर आमचं घर पाहावं. ते घर तरी कसं म्हणायचं ? अंधार कोठडीच. घर तरी केवढं ? एवढंसं. लहानखोरं. चिनुपटाणं. त्याला सोपा नव्हता, की परडं नव्हतं. चार-पाच माणसं बसली की थिटं पडायचं. तिथंच चूल. तिथंच भात सडायचं व्हान. तिथंच दळणाचं जातं. वर कात्राबोत्रांची वलण लोंबत असायची. भिंतीला लागून माचोळी. त्यावर धान्याची कुडिकं कशीबशी स्वत:ला सावरीत कढ सोशीत राहायची. चुलीच्या भानुशीवर गाडग्यांची उतरंड कलंडून असायची. वरच्या आढ्याच्या धाकानं घुसमटून गेलेला, धुराटलेला पोटमाळा होता. त्यात अंधाराचा बागुलबुवा लपून बसलेला असायचा. शेणी आणि गवत, कडबा कोंबून ठेवलेला असायचा. पोटमाळ्याच्या चिवाट्या खालून अंधारी धुरानं पार धुरकटून गेलेल्या असायच्या. उंदरांची खसखस सतत ऐकू यायची. या मधघराला लागून एक छोटीशी हातपाय दुमडून बसलेली खोली होती. तिथं सारी अडगळ भरलेली असायची. तिकडं पाहिलं तरी भीतीचा काटा अंगावर यायचा. वारा यायला कुठेच खिडकी नव्हती की साधी फट नव्हती. घराभोवतीनं सारी हागणदारी होती.

याच आमच्या घराच्या भिंतीपलीकडं चुलत्यांच्या अशाच अंधार कोठड्या. समोर वाव दीडवावची छोटीशी कुडामेढीची छपरी. तिथंच न्हाणीचा आडोसा. बाजूला

कोंबड्यांची खुराडी आणि शेरडा कोकरांच्या लेंड्या, मुताचा उग्र वास येणारी खोपटी. दारातून खाली जाणारं बोळकांडं. या बोळकांड्याच्या दोन्ही बाजूंनी खुराड्यासारखी दहा-पंधरा घरं. या बोळात घाण पाण्याचा सतत कुजकट वास येणारा खतखत खातेरा. त्या खातेऱ्यातून माणसं, गुरं-ढोरं, शेरडं, कोकरं यांची ये-जा. कोंबड्यांनी उकरलेला खातेरा आणि त्यावर घोंगावणारी डासांची जनता. यालाच गाववाले नलगेवाडा म्हणत. आमच्या गल्लीला असे दोन-तीन वाडे होते. एक शेळकेवाडा, दुसरा नलगेवाडा, तिसरा नाईकवाडा. ही तर चिंचोळ्या बोळक्यांची घनचक्कर वस्ती; पण याला वाडे का म्हणत होते याचं मला कोडं काही सुटत नव्हतं. गावात आणखी तीन वाडे होते. एक सावकारवाडा, दुसरा पाटीलवाडा, तिसरा त्र्यंबकवाडा. हे वाडे तर भले मोठे. फरसबंद, चिरेबंद, चौसोपी आणि बारा खणी. भीती वाटावी अशा भिंती आणि भले मोठे दरवाजे. इथली माणसं तशी वजनदार, गावावर वचक असणारी. सारी रयत तिथं दबकत वावरायची. येणाऱ्या खातेऱ्यानं ज्यांची कळा घालवलेली आहे अशा जुन्यापान्या, कौलारू घरांच्या बोळातल्या वस्तीला वाडे का म्हणतात ? याचं उत्तर मात्र सुटता सुटत नव्हतं.

आमच्या गावाच्या मध्यभागी उंचावर श्री नीलकंठेश्वराचं देऊळ आहे. खूप मोठा असा त्याचा पसारा. सभोवती लांबरूंद पडव्या. ऐसपैस सभामंडप. महादेवाच्या पिंडीचा मुख्य गाभारा तो वेगळाच. त्याच्यावरच्या कळसावर वाऱ्यात फडफडणारी भगवी पताका कुठूनही दिसे. या देवळाच्या समोर जोतिबाचं जुन्या बांधणीचं देऊळ आणि समोरच्या पटांगणाच्या दक्षिण कोपऱ्यात शाळेच्या पाठीमागं उघड्यावरच कमरेइतक्या उंचीचा बिचारा हनुमान शांतपणे उभा असलेला. फुललेली चाफ्याची झाडं, बहरलेलं हिरव्यागार पानांचं बेलाचं झाड यांनी इथला परिसर ऊन-सावल्यांचा खेळ खेळत असल्यासारखा भासे.

या पटांगणाला पाठमोरं ठेवून चावडी आणि शाळा आपापल्या गोंगाटात रमलेल्या असायच्या. यांच्यासमोर असलेला चौक म्हणजे चावडीचा टेक. या टेकापासून तीन गल्ल्या फुटतात. दोन उगवतीला जातात. त्यातील एक परीट गल्ली, दुसरी पाटील गल्ली. एक मावळतीला फुटते तिला कंठापूर म्हणत. कंठेश्वराच्या देवालयाच्या डावीकडे उत्तर बाजूला एक मोठा तलाव निवांतपणे असल्यासारखा वाटला तरी साऱ्या गावाची वर्दळ तिथं. तिथल्या प्रचंड वडाच्या हिरव्या पसाऱ्यानं आणि उंच पिंपळाच्या लहरणाऱ्या चकचकीत पानांमुळं तलावाला शोभा आलेली. या तलावाच्या पायथ्याला हिरवीगार शेती, तर उशाला मावळतीच्या डोंगराची छानशी धनगर टेकडी कशी मनात भरते. तळ्याची पाळी ओलंडली की लहानखोरी तळ्याची वाडी लागते.



असा हा माझा गाव. या गल्लीच्या टोकापासून त्या गल्लीच्या टोकापर्यंत एका दंडीनं घरं असलेला. इथून तिथून एका आढ्याचा. कौलारू घरांचा. गावपांढरीला लागूनच जीव लावणारी गावंदर. गावाच्या या शिवेपासून त्या शिवेपर्यंत वळसा घालून वाहणारी वारणामाई. तिन्ही बाजूंनी दिसणाऱ्या सह्याद्रीच्या डोंगररांगा. त्यांच्या माथ्यावर विसावलेला निळ्या नभाचा गोल घुमट. उगवतीच्या फिफिऱ्याच्या डोंगरावर उगवलेला गोजिरवाणा सूर्यनारायण वारणा खोरं ओलांडता ओलांडता दमून जातो आणि थकून मावळतीच्या साताळीच्या डोंगरावर माथा टेकतो. उंच उंच डोंगर. उंच उंच आकाश. दूरवर असलेला नदीकिनारा. एवढ्या परगण्याला नजरेच्या टापूत ठेवून साताळीच्या डोंगरकुशीत नांदणारा हा माझा गाव. भेडसगाव हे त्याचं नाव. आडवळणी-आडमार्गी, दुर्गम मुलखात. ऐन पावसाळ्यात बाहेरच्या जगाच्या वाटाच पार पुसून टाकलेल्या. एरव्ही पायवाटही धड नसायची. पंधरा-वीस मैल चालत जावं तेव्हा कुठं बाहेरच्या जगाची कच्ची वाट लागायची.

बाहेरच्या जगाचं कसलंच वारं इथं पोहोचलेलं नसायचं. वारणाकाठी, सह्याद्रीच्या डोंगरकपारीच्या चिमुऱ्यात आपल्याच नादात वसलेला माझा गाव. या गावाच्या कंठापूर गल्लीतील शेवटच्या टोकाला गपगुमान असलेल्या आणि फारसा म्हाजूर नसणाऱ्या घरात माझा जन्म झाला. शेरडा कोकरांच्या लेंड्या मुतात आणि अंधाराच्या सोबतीनं माझं बालपण रांगत गेलं. वडील चंद्रापा पण माणसं चंद्रुदा असं म्हणत. ते ठार अडाणी. घराण्याचा शेंडाबुडखा अक्षरांच्या दुनियेपासून कितीतरी योजनं दूर. जणू अक्षरांचा आणि आमच्या घराण्याचा सुतराम संबंध नव्हता. अक्षरांचा गाव आपल्यासाठी नाहीच हीच मुळात घट्ट राहिलेली धारणा. तेहतीस कोटी देवांनी अठराविश्व दारिद्र्य या घराण्याच्या पदरी बांधलेलं आणि या घराण्यानंही 'पदरी पडलं आणि पवित्र झालं' असं म्हणून घराच्या अंधाराच्या सोबतीला या दारिद्र्याला ठेवून घेतलं होतं.

पण आमचे दादा करारी होते.

दादा अडाणी, अशिक्षित पण कष्टाळू होते. त्यांच्या पाचवीला गरिबी पूजलेली होती. दादांना कळायला लागलं आणि त्यांचे वडील त्यांना पोरके करून निघून गेले. आई भाबडी होती. कुडामेढीच्या छपरातलं त्यांचं जिणं होतं. पदरी जमीनही पुरेशी नव्हती. दोन-तीन महिने पुरेल एवढंच उत्पन्न निघायचं. एखादं कुडिकं भरायचं. पोटाला चिमटा द्यायचा आणि दुसऱ्याच्या रोजगाराला जायचं. उभं वर्ष याच विवंचनेत जखडून टाकायचं. त्यांना राबणं एवढंच माहिती होतं. कधी ते उसंत घ्यायचे नाहीत. आई-वडिलांकडून दोन दिवस आधार मिळेल असं काहीच मिळालं नव्हतं. निराधारासारखं

वाट्याला जिणं दिलं याची बोच त्यांना असायची. त्यामुळे त्यांचा स्वभाव चिडचिडा आणि करडा बनला होता; पण कष्टाला जुंपून घेण्यात त्यांनी कधीच कसूर केली नाही. चारचौघांसारखं बालपण मिळालं नाही.

कळायला लागल्यापासून गरिबीचे चटके बसत आलेले. तरीही कामाला लागले की वाघच होते. त्यांनी मिळेल तो पैसा गाठीला बांधून ठेवला. मोलमजुरीनं थोडी उसंत मिळाली की रानामाळातले दगडधोंडे गोळा करायचे. त्या दगडधोंड्यांचीच चिखलमातीत स्वत:च्या हातानं एक एक भिंत उभी केली. रात्रीचंच राबून हा चिखलमातीचा आसरा मांडला. एकेका गाडग्यामडक्यानं उतरंड उभी राहत गेली. चुलीच्या भानुशीला काजळी धरणारा का होईना दिवा जळत राहिला. आढं पाखाड्यांनी घराचं घरपण दिलं. उसं टेकायला सावली मिळाली. याच घराच्या अंधारात आम्हा आठ भावंडांचे पाळणे हलले. नावाच्या घुगऱ्या कशातरी शिजल्या. आम्हाला नकळत सटवीनं आमच्या कपाळी कसला कसला लिखा लिहिला. आमचं जगणं आम्हाला चिकटलं गेलं. आमच्या आईला बाळंतपणात बाजलं मिळालं नाही की फाटकं तुटकं खाटलं मिळालं नाही. बाळंतपणाच्या दुसऱ्या दिवशीच कामाच्या रगाड्यात चिंबून जाई. दोन घासही पुरेसे नसायचे. बाळांच्या नशिबी पटकुरं असायची. असल्या आबाळीतही पोरं जगत राहायची. मोठ्या घरी पोरं जगत नसत. तेव्हा मांगाच्या चांगूबाईकडं द्यायचीत. ती जगली वाचली तर तिला कोंडा देऊन ती पोरं मोठ्या घरात आणत. अशी कोंड्यावरची पोरं या गावात मोठ्या मोठ्या घरात होती. जिथं दात आहेत तिथं चणं नसायचं अशातली गत; पण आम्हाला कधी मुडदूस झाला नाही की बाळगुतं झालं नाही, की कोंडा लागला नाही.

आम्ही आठ भावंडं जेव्हा जन्मलो तेव्हा पहिल्यांदा डोळे उघडले तेव्हा जगातलं पहिलं काय दिसलं असेल तर ते या घरातला जीव गुदमरून टाकणारा अंधार आणि बोळातला खातेरा. लोंबणाऱ्या मळकट शिंक्याकडं कुतूहलानं पाहात राहणं हाच चाळा. तेच मनोरंजन. आईचा डोळा चुकवून पोटानं सरकत सरकत उंबरा ओलांडून खाली पडलं की बाहेरच्या जगाचं पहिलं दर्शन घडायचं. पुढं बाळमुठीतला घास पळवणाऱ्या चिऊकाऊचं अंगण नव्हतं की, पाठीमागं आभाळीचा चांदोमामा लपायला निंबोणीचं झाड असणारं परडंही नव्हतं.

रांगायला आलं, पायात नेट आला की, दादा शेरडाकोकरांच्या मागं पिटाळायचे. म्हसरांच्या मागं लावायचे. बिरड्याची फाटकी कुडती घालून थंडीवाऱ्यातनं आम्हीबी गपगुमान जायाचं. म्हसरांच्या मागनं हेलपाटत धावायचं. म्हसरं रडकुंडीला आणायची.



दुसऱ्याची म्हसरं राखणंला घ्यायची. थोडंसं पोरसवदा झालं की भांगलणी टोंगलणीला जुंपायचे. मग हळूच औतपाण्यात गुंतवून टाकायचे. जडभारी कामानं दमछाक होऊन जायची. पुरतं कळायच्या आत असं कामाच्या रिंगाट्यात रगडून जावं लागायचं. त्यामुळं बालपणातली हौसमौज आमच्याकडं फिरकलेलीच नसायची. असं आम्हा आठही भावंडांच्या कपाळी थोड्याफार फरकानं हेच रिंगाट आलेलं होतं. गल्ली, गाव क्वचितच आमच्या वाट्याला आलेलं असायचं; पण गावशिवार, रानमाळ, डोंगरदरे यांची आमच्या बालमनावर भुलावण पडायची. आमच्या घरी अठराविश्वे दारिद्र्य असले तरी ही अवतीभोवतीची रानदौलत पाहून भूकही विसरून जाई. सुग्या सुरू झाल्या की आमचा दुकाळ कमी होई. दादा लोकांच्या काढणीमळणीला जात. सुगीत रातदिन राबत. तेवढ्यापुरतं का होईना दळिंदर दूर होई. गोरगरीब या सुगीची वाट पाहात राही.

खरं तर पीक काढणी म्हणजे एक हंगाम. केवढा उत्सव ! उत्सवच तो. केवढा आनंद, केवढा हुरूप, कोण उत्साह. तहान कसली, भूक कसली, तो तर देवाच्या देण्याचा उत्सव. या देण्यानं जो तो तृप्त. कृतज्ञ. ते आभाळघडीचं दान घेण्यात जो तो रमून गेलेला असतो. घरदार कसं या उत्सवात दंग झालेलं असतं. पोराबाळांचा उत्साह ऊतू चाललेला असतो. दिवस गजबजत असतो. रात्र मळण्यांनी गजगजत असते. चांदण्यातील काढणी, मळणी तर अपूर्व आनंदाची. आम्हाला अपरूप वाटायचं.

ज्यांना गावात घर नाही. शिवारात शेत नाही अशी माणसंही, परमेश्वराच्या या दौलतीनं आपलं दैन्य विसरतात. या अपूर्व सोहळ्यात सामील होत असतात. त्यांच्या चेहऱ्यावर नवा उजाळा आलेला असतो. बैतंबलुतं हरखून गेलेलं असतं. भिकार-खाकाऱ्यांच्या झोळ्यांना नवी जाग आलेली असते. वाण्या-उदम्यांना पडणारी स्वप्नं भरल्या हंगामाची असतात. फिरस्त्यांना खळ्यादळ्यातली ही दौलत आपलीच वाटते. खरंच आहे ते, पिकलं रान तर जाईल वाण. गाता गळा आणि पिकला मळा असल्यावर काय उणं. आमचंही तसंच होतं.

शेतकऱ्यांच्या घामानं मातीचं सोनं झालेलं असतं आणि त्याच भरवशावर जीव जिवाणू जगत असतं. शेतकऱ्याच्या घामावर विश्वास ठेवून कीडामुंगी जगत, तगत असते. त्याच्या या घामानं मातीला मातीपण, आभाळाला आभाळपण आलेलं असतं. जीवाला जीवपण लाभतं. म्हणूनच पशु-पक्षी, प्राणी, जळथळ जगण्याची इच्छा धरून जगत असतं.

या जगण्याला तूस लागू नये म्हणून, चराचराच्या विश्वासाला ढळ पोहोचू नये म्हणून शेतकरीराजा राबत असतो. उन्हात तळत असतो. चिखलपाण्यात जगणं मळत

असतो. आपलं जिणं पणाला लावत असतो. नव्या किमयेचं जग रानामाळात उभं करीत असतो.

या नव्या निर्मितीत त्याला आनंद होत असतो. रमत असतो. रंगत असतो. काळ्या मातीत तरारलेली हिरवी दुनिया पाहून त्याचं निरागस अंत:करण बेहोष होऊन जातं. दिवस बदलतात. ऋतूंचं चक्र फिरत राहतं. दिसामासांनी नव्या रंगारूपांनी नटलेली ही दुनिया हे त्याचं लसलसतं जगणं असतं. आम्ही त्यात हरवून जात असू.

पण हे यज्ञकर्म करताना खूप काही शेतकऱ्यांच्या हातून निसटून जातं, सांडतं, लवंडतं, झडतं, पडतं. घासरूपानं पोटात जाईल तेच त्याचं असतं. हक्काचं. मालकीचं. भरल्या मापाची शिगोशिग ही त्याची नसतेच मुळी. लाख वाटा फुटतात, पण कितीही उणंदुणं झालं तरी त्याची त्याला खंत नसते. खेद नसतो, वैषम्य नसतं.

त्याला त्याच्या भरल्या दौलतीचा जमा आणि खर्च याचा हिशेब नसतो. तसा हिशेब करायला त्याला उसंतच नसते. येईल क्षण तो कष्टानं वेचणं एवढंच त्याला माहीत असतं. त्याच्या ओट्यापदरात किती आलं, गेलं याचं त्याच्याकडं गणित नसतं. कारण सर्वांचा तो पोशिंदा असतो.

मी माझ्या कळत्या वयापासून पाहात आलोय. ग्रामीण जीवन किती मोकळं-चाकळं असतं. रानझऱ्यासारखं निर्मळ असतं. निसर्गाचं दातृत्व त्याच्या नसानसात भिनलेलं असतं. तो त्याचा सहजभाव असतो. पेरणीपासून ते खळ्यादळ्यातल्या राशीपर्यंत आणि तिथून कणग्या टोपल्यांच्या भरणीपर्यंत किती सरावं, किती ठरावं याची गणती नसते. पेरणीसाठी कुरी जडली की सुतार मेटावर तिची पूजा केली जाते, तिथं बेऱ्याचं पहिलं दान घडतं. या देण्यालाही माप नसते. सारं साळढाळ. पसाकुडचा माहितीच नसतो. सारं देणं घेणं सुपानं. एकदा कुऱ्या पूजल्या की बेऱ्यासाठी बलुतेदार अंगणात उभे असतात. ज्यांचा ज्यांचा नित्य कामाच्या जडणीसाठी हात लागतो त्यांच्यासाठी हे हक्काचं दान असतं. त्यांनी यावं, खळंदळं पिकावं अशीच मनोमनी धारणा असते. पेरणीच्या बी-बियाणातला पेरा त्यांनी नेला तर समाधान असतं. साऱ्यासाऱ्यांनी हात लावलेला असतो. म्हणून तर हा पेरणीचा सोहळा. कुणी औतं जडवून घडवून दिलेली असतात, कुणी विळे, फाळ परजून दिलेले असतात. कुणी वाली, दोर दोरखंड दिलेलं असतं. कुणी मोट नाडे बांधून दिलेले असतात. कुणामुळे गाडग्या मडक्यांच्या उतरंडी घराला घरपण देत असतात. सणासुदीला ठाकर-सोनारांची आठवण तर पाचवीलाच पूजलेली.



खास बियाण्यासाठी वर्षभर लिंपून जपून ठेवलेली कणग्या टोपली पेरणीच्या हंगामात फोडली जातात. कुणी मागतकरी येतं. घेऊन जातं. कुणी पैरंकरी येतो, तसाच लाटतो. पै पाव्हणं अडून-नडून येतात. पेरणी तटलीय म्हणून खोळ भरतात. शेजारपाजाऱ्यांची वर्दळ सुरू होते. गावकुसाकडं आशेनं पाहणारी माणसं दारात उभी राहतात, त्यांचा काळ निघतो.

अशातच शेताभातात एकच गोमकाला उडतो. पेरण्यांची घाई चालते. औतांनी शिवार गजगजून जाते. पेरे होतात. शिवार कसा नुळनुळीत बनतो. शेतकऱ्यांच्या काळजात समाधान मावत नसतं. त्याच्या झटण्याचं, कष्टण्याचं चीज झालेलं असतं, पेरा झाला की सारं जग जिंकण्याचा आनंद त्याला होत असतो. काळ्या ढगांनी आभाळ व्यापलं की त्याच्या आनंदाला पारावारच उरत नसतो. 'पावश्या गो' ची साद रानारानात घुमत असते.

पेरा होतो. बी-बियाणं मातीच्या पदराखाली लपतं; पण त्याच्याही पाठपुराव्यासाठी कीडा-मुंगी फिरत असते. चिमण्या-कावळे टपलेले असतात. कोंबडी कुकडी दाणं टिपत असतात. शेरडं-कोकरं उधळमाधळ करीत असतात. बिचाऱ्या शेतकऱ्यांचं काळीज हालत असतं. काही वेळा मायमातीच बियाणं पोटात घेऊन बसते आणि मग दुसऱ्या बियाण्यासाठी बिचाऱ्या शेतकऱ्याला धावाधाव करावी लागते. कधी पाऊसच वैरी बनून कोसळतो. शेताच्या धन्याचं तोंडचं पाणी पळवतो.

यातूनही उरूनपुरून बी अंग धरतं. अंकुरतं. नवा जन्म येतो. पानपान वाढतं. पोसवतं. तरारून डोलायला लागतं. आपल्याच मस्तीत हलतडुलत राहातं. नव्या बाळश्यानं झुलायला लागतं अन् याच वेळी इतरांच्या नजरा त्याला डसतात. लगटतात, झोंबतात, नको त्याला पाय फुटतात. पंखांना बळ येतं. साऱ्यांच्या काळजात ही हिरवाई ठसठसत राहते. ही हिरवाई पोटऱ्यात येते. लोंब्या भरू लागतात. फळफळावळ पिकू येतं. भरल्या रानाची आवई सगळीकडं उठते. गहू, हरभरा, वरणा, वाटाणा, तूर, मसूर, ज्वारी, जोंधळा, ऊस, भुईमूग, वाळकं, कलिंगडं, रताळी, गाजरं असं मळ्यादळ्यात उभं असतं. भरल्या जित्राबाची स्वप्नं खाण्यापिण्याचा पांग फेडायला सजत असतात. भोरड्यांच्या झुंडी सुटतात. पोपटाचे थवे कलकलत असतात. अंगणातले काऊचिऊ वेळी अवेळी बांधवडीच्या झाडाझुडांवर मुक्काम ठोकतात. कोल्हीकुत्री रात्री-अपरात्री दबा धरून असतात. चुकार जनावरांची दिवसा दुपारीही गनिमी काव्यासाठी तयारी असते. खवल्या मांजराचे अन् रानउंदराचे खेळ राजरोस नसले तरी चुकापाडीनं चाललेलेच असतात. खोकडामाकडांचे चाळे त्यांच्या